दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
● रविवार, दि. ७ जून २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागाच्या वतीने हिंदवी स्वराज्य् संस्थापक व संकल्पक छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री. एस.के.धनवडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करणेत आले.

यावेळी स्वागत इतिहास विभाग प्रमुख डॉ.एस. आर.कट्टीमनी यांनी केले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, आजचा दिवस हा भारताच्या इतिहासातील गौरवशाली दिवस असून अखंड भारताच्या राष्ट्र निर्मितीचा पाया छत्रपती शिवरायांनी आजच्या दिवशी घातला. छत्रपती शिवाजी महाराज हे उत्कृष्ठ् प्रशासक व भारतीय आरमाराचे निर्माते होते. प्रा.समृध्दी माने म्हणाल्या, जातीधर्माच्या भिंती भेदून, माणसाला माणूसकीने जगायला शिकवणारे राज्य् म्हणजे शिवरायांचे स्वराज्य्. शिवाजी महाराज हे मानवी मूल्ये जोपासणारे प्रगल्भ् विचारांचे तत्ववेता राजे होते.

प्रा. डॉ. कविता तिवडे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी अधीक्षकसंजय दळवी, प्रा.सनी काळे, अमित साळुंखे, मदन निगडे, जितेंद्र शिंदे, वसंत पाटील, सर्जेराव खोत, अनिल खोत, प्रशांत पाटील, पी.बी.हरेर,विनायक जाधव यांच्यासह महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर कॉलेजचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.



पुढारी MY कोल्हापूर रविवार, ७ जून २०२६

# शिवराज्याभिषेकदिन उत्साहात साजरा

## शहरासह परिसरात रक्तदान शिबिर; व्याख्यानासह विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेकदिन शनिवारी शहरासह परिसरात उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त रक्तदान शिबिर, अभिवादन व्याख्याने आदी कार्यक्रम आयोजित केले होते.

**शिवशक्ती प्रतिष्ठान**

शिवशक्ती प्रतिष्ठानच्या वतीने टाऊन हॉल उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या संगमरवरी स्मारकाची स्वच्छता- सजावटीसह अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठानचे सातापा कडव, संदीप पाडळकर, प्रवीण कुरणे, गणेश मांडवकर, श्री कुरणे, आकाश काशीद, सुशांत शिंदे, रणजित सुतार, मनीष बडदारे, श्रेयस कुरणे, विश्वास गंगाधर, तुकाराम खराडे, तुषार मोरे, रूपेश जाधव आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवराज्याभिषेकदिनानिमित्त शिवसेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी चौकात शिवरायांना अभिवादन करण्यात आले.**

**गोकुळ दूध उत्पादक संघ**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिवाजी महाराजांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. यावेळी संघाचे प्राधिकृत अधिकारी मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार सुद्रीक, सदस्य प्रदीप मालगावे, सागर बलकवडे, डॉ. चंद्रकांत परुळेकर, गोकुळचे कार्यकारी संचालक डॉ. योगेश गोडबोले, डेअरी महाव्यवस्थापक अनिल चौधरी, मार्केटिंग व्यवस्थापक हनमंत पाटील, पशुसंवर्धन व्यवस्थापक डॉ. दयावर्धन कामत, धनाजी पाटील, डॉ. प्रकाश दळवी, अशोक पुणेकर, जनसंपर्क अधिकारी सचिन पाटील आदी उपस्थित होते.

**विवेकानंद कॉलेज**

विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागाच्या वतीने राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी, प्रा. समृद्धी माने आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

● रविवार, दि. ७ जून २०२६



# वृक्षारोपणासह संगोपनाची जबाबदारी हीच पर्यावरण जागृती

## विवेकानंद महाविद्यालयातील कार्यक्रमात कर्नल विक्रम नलवडे यांचे मत


**जनप्रवास : कोल्हापूर**

बदलती जीवनशैली जागतिकीकरण वाढणारे उद्योगधंदे, प्रसरण पावणारे नागरिकरण यामुळे निसर्गाच्या ऱ्हास होत आहे. निसर्गाच्या ऱ्हासामुळे हवामान बदल आणि सजीव जीवनसाथी धोक्यात येत आहे. त्याचे संरक्षण करण्याकरिता वृक्षारोपणासोबत वृक्ष संगोपन हे सक्षमतेने करावे, असे मत कर्नल विक्रम नलवडे यांनी विवेकानंद महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण प्रसंगी मांडले.

प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत मांडले. पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम महाविद्यालयात एन.सी.सी., एन.एस.एस. या विभागामार्फत राबविण्यात आला. सदरच्या कार्यक्रमासाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रा. नरेवाडीकर एन. ए. केअरटेकर, ०६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन, डॉ.पी. आर. बागडी यांनी केले. याप्रसंगी प्रा डॉ. अर्जुन कुंभार, डॉ. जी. जे. नवाथे, एस. के. धनवडे, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि एन.सी.सी. छात्र उपस्थित होते.

दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा

• रविवार, दि. ७ जून २०२६



# कौस्तुभ हवालदार याची मुंबई पोलीसमध्ये निवड

## • विवेकानंद कॉलेजच्या वतीने हवालदार यांचा सत्कार

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद महाविद्यालयातील बी.सी.एस. भाग ३ मधील विद्यार्थी कौस्तुभ हवालदार याची मुंबई पोलीस मध्ये कॉन्स्टेबलपदी नियुक्ती झाली. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कसबा नेसरी येथे झाले तर महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे झाले.

या यशाबद्दल प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. रजिस्ट्रार धनवडे, अधीक्षक संजय दळवी, स्टेनोग्राफर बी. आर. करपे उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. सी.बी.पाटील म्हणाले, अत्यंत सामान्य कुटूंबातून आलेल्या कौस्तुभ हवालदारने जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर मिळविलेले हे यश अत्यंत कौतुकास्पद असे आहे. कौस्तुभ हवालदारच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या यशात मोलाची भर पडली आहे. या विद्यार्थ्यास बी.सी.एस. विभागाच्या प्रमुख प्रा.पल्लवी देसाई, प्रा.राजेश माने आदी सहकारी प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी अभिनंदन केले.